जावक क्रमांक 7558/२०२५
चिंचवड पोलीस ठाणे कार्यालय
दिनांकः- 25/११/२०२५

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
नेहरुनगर कोर्ट, पिंपरी पुणे.
यांना सविनय सादर,

**प्रतिवेदक** :- विठ्ठल करंबळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, चिंचवड पोलीस स्टेशन,पिं.चिं.
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय :- चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३३५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) मधील गुन्हयाचा तपासाचे अहवालाबाबत..**
**संदर्भ :- मा.न्यायालयीन फौजदारी अर्ज क्रमांक १०७७/२०२५ दिनांक २४/११/२०२५ अन्वये**

---

**महोदय,**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन | चिंचवड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड |
| २ | गुन्हा रजि. नं. व कलम | ३३५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) प्रमाणे |
| ३ | फिर्यादी | सतीश मोहन शेरखाने, वय ४८ वर्षे, धंदा नोकरी (ब्लिंकिट डिलिव्हरी बॉय), राठि. रुम नं. ०५, माउलीची आशा बिल्डींग, ओम कॉलनी नं. ०२, बिजली नगर, चिंचवड, पुणे |
| ४ | पिडीतेचे नाव व पत्ता | कु.स्मृती उर्फ कृतीका सतिश शेरखाने वय १७ वर्षे ,०३ महिने (जन्म दि. २२/०६/२००८) राठि. रुम नं. ०५, माउलीची आशा बिल्डींग, ओम कॉलनी नं. ०२, बिजली नगर, चिंचवड, पुणे |
| ५ | आरोपीचे नाव व पत्ता | अज्ञात इसम नाव पत्ता माहीत नाही. |
| ६ | गु.घ.ता.वेळ ठिकाण | दिनांक २५/०९/२०२५ रोजी सकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास रुम नं. ०५, माउलीची आशा बिल्डींग, ओम कॉलनी नं. ०२, बिजली नगर, चिंचवड, पुणे |
| ७ | गु.दा.ता.वेळ | दिनांक २५/०९/२०२५ रोजी २३.३२ वाजता |
| ८ | तपासी अधिकारी | सहाय्यक पोलीस निरीक्षक, विठठल करंबळकर, चिंचवड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड शहर, पुणे |
| ०९ | हकीगत | यातील फिर्यादी यांची फिर्याद की, दि. २५/०९/२०२५ रोजी सकाळी ०७.३० वा चे सुमारास रुम. नं. ०५, माऊलीचा आशा बिल्डींग, ओम कॉलनी, नं. ०२, बिजलीनगर, चिंचवड पुणे. येथुन फिर्यादी नामे सतिश मोहन शेरखाने, वय- ४८ वर्षे, धंदा-नोकरी, रा. रुम नं. ०५, माउलीची आशा बिल्डींग, ओम कॉलनी नं. ०२, बिजली नगर, चिंचवड, पुणे यांच्या राहत्या घरातुन फिर्यादी यांची लहान मुलगी नामे कु.स्मृती उर्फ कृतीका सतिश शेरखाने वय १७ वर्षे ,०३ महिने ही निघुन गेली असता कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता पिडीतेस पळवुन नेले असल्याची फिर्यादी यांना खात्री झाल्यावरुन फिर्यादी यांनी सदर अज्ञात इसमाच्या विरोधात कायदेशीर तक्रार दिली आहे म्हणुन भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा नोंद आहे. |

O
Filed.
28/11/2025

१) सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासाचा अहवाल चिंचवड पोलीस स्टेशन जावक क्र. ७५५४/२०२५ दि.२४/११/२०२५ अन्वये मा.न्यायालयात सादर करण्यात आलेला असुन सदर गुन्हयातील पिडीताचा व संशयित आरोपीताचा शोध घेत आहोत.

२) फिर्यादी यांच्या राहत्या परीसरातील ओम कॉलनी नं. ०१, ०२, ०३ पासुन ते हनुमान स्विट शेजारील आर के ट्रेडर्स या दुकानापर्यंत सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहिले असता पिडीत ही दोन बॅग घेवुन संशयीताच्या रिक्षा मध्ये बसुन बिजलीनगरच्या चौकाकडे जाताना दिसत आहे. चिंचवड परीसरातील रस्टन कॉलनी समोरील रोडवरील मॅट्रीक्स कंपनीचे लावण्यात आलेल्या सिसीटीव्ही कॅमेरा फुटेज पाहिले असता सदर रिक्षा ही चाफेकर चौकाच्या दिशेने जाताना दिसत आहे. चाफेकर चौकातील पोलीस स्टेशकडील सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज पाहिले असता सदर रिक्षा ही चाफेकर चौकातुन जाताना दिसत नसल्याचे आढळुन आले आहे. रस्टन कॉलनीकडुन फतेचंद शाळेकडुन जुन्या जकात नाक्याकडे जाणाऱ्या दिशेने तेथील माही एल इ डी शॉप, वेलनेस मेडीकल येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता काही एक उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. एस के एफ कंपनीच्या दिशेने प्रेमलोक पार्ककडे जाणाऱ्या तसेच अहिंसा चौकाच्या दिशेने जाणाऱ्या साई कंन्ट्रक्शन, तुलसी मेडीकल, मराठा दरबार, येथील सीसीटीव्ही सीसीटीव्ही फुटेज तपासले असता काही एक उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. सदर रोडवरील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन लावण्यात आलेले स्मार्ट सिटी सीसीटीव्ही कॅमेरे हे तांत्रिक अडचणीमुळे बंद असल्या कारणाने सदरचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त झालेले नाहीत.

तसेच आम्ही कोणतेही सीसीटीव्ही फुटेज हे काढुन टाकले अगर त्यात कोणतीही छेडछाड केलेली नाही. तसेच फिर्यादी हे राहत असलेल्या इमारतीतील सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता सदर सीसीटीव्ही फुटेजचा बॅकअप हा उपलब्ध नसल्याने टेक्नीशियन मार्फत सीसीटीव्ही फुटेजच्या कंपनीला सदर दिवसाच्या बॅकअप संदर्भात टेक्नीशियनने मेल केलेला होता. तसेच इमारत मालकाने सदर सीसीटीव्ही फुटेजचा ॲक्सेस हा फिर्यादी यांना दिलेला होता.

३) सदर संशयित आरोपीतास पोलीस स्टेशन येथे आणुन त्याच्याकडे पिडीत मुलीचा शोध घेण्याच्या अनुषंगाने त्याच्याकडे चौकशी करण्यात आली तसेच त्याचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. तसेच संशयित आरोपीताला सोबत घेवुन चिंचवड परीसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली असता सदर पिडीतेबाबत काही एक माहिती प्राप्त झाली नाही. सदर संशयिताने पिडीतास पळवुन घेवुन गेला असल्याचा संशय आला नाही कारण पिडीत ही दि. २५/०९/२०२५ रोजी तिच्या राहत्या घरातुन निघुन गेली होती परंतु संशयित इसम हा दि. २७/०९/२०२५ रोजी पर्यत चिंचवड परीसरामध्येच होता. संशयित इसमाकडे आम्ही दि. २७/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा पासुन ते सायंकाळी ०७.०० वा पर्यत चौकशी करीत होतो. तसेच सदर इसमास आम्ही जास्त कालावधीकरीता पोलीस स्टेशन येथे थांबवुन ठेवु शकत नसल्यामुळे सदर इसमास दि. २८/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा गुन्हयाच्या तपासाकरीता हजर राहणेबाबत तोंडी सुचना देवुन सोडुन देण्यात आले होते. सदर इसम हा त्याच दिवशी २०.०० वा घरातुन निघुन गेला असुन त्याबाबत त्याचा भाऊ नामे अर्जुन अंकुश राजीवडे याने चिंचवड पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीवरुन हरविलेली मोठी व्यक्ती रजिस्टर नोंद क्र. १२५/२०२५ दि. २८/०९/२०२५ अन्वये मनुष्य मिसींग दाखल केलेली आहे. संशयिताने पिडीताला पळवुन घेवुन जायचे असते तर तो त्याच दिवशी पिडीतासोबत गेला असता. संशयित हा दोन दिवस चिंचवड परीसरामध्ये थांबला नसता त्यामुळे संशयितावर आम्हास संशय आला नाही.

४) दि.०२/११/२०२५ रोजी पिडीत मुलीला पुनावळे, पुणे येथे पाहिले असलेबाबत फिर्यादी तसेच फिर्यादी यांच्या कुटुंबियानी आम्हाला दि. २४/११/२०२५ रोजी पर्यंत माहिती पुरविलेली नाही. तसेच दि. ०२/११/२०२५ रोजी पिडीत मुलगी ही पुनावळे येथे होती या बाबतची माहिती फिर्यादी यांना दि. १४/११/२०२५ रोजी समजले असल्याचे फिर्यादी यांनी आम्हास दि. २४/११/२०२५ रोजी सांगितले.

५) दाखल गुन्हयातील पिडीत मुलगी कृतिका शेरखाने व संशयित इसम कृष्णा राजीवडे हे मिळुन येताच पिडीताकडे अधिक तपास करुन दाखल गुन्हयात योग्य ती कलमवाढ करुन पुढील कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

मार्फतीने सादर,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चिंचवड पोलीस ठाणे, पिं.चिं.आयुक्तालय

मा.सादर व्हावे.
दि. /११/२०२५

(विठ्ठल करंबळकर)
सहाय्यक पोलीस निरीक्षक
चिंचवड पोलीस ठाणे,पिं.चिं.